# RECOVERY OF STOLEN PROPERTY

**Police Station : -** LOCAL CRIME BRANCH
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 28/12/2016

सकाळ दि. ३०.१२.१६

# सोन्याची दोन बिस्किटे जप्त

## गुन्हे शाखेची कारवाई : तेलंगणातील तिघांना अटक; कसून चौकशी सुरू



चंद्रपूर : जप्त करण्यात आलेल्या सोन्याच्या बिस्किटांसह रोख.

चंद्रपूर, ता. २९ : बसस्थानकासमोर असलेल्या जिल्हा उद्योग केंद्र परिसरातील एका वाहनातून पोलिसांनी सोन्याची बिस्किटांसह तिघांना अटक केली. त्यांच्याकडून १० लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, सोन्याची बिस्किटे आणली कुठून, याचा तपास सध्या पोलिसांनी सुरू केला आहे. अटकेतील तिन्ही आरोपी तेलंगणातील आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावर जिल्हा उद्योग केंद्र आहे. या केंद्रासमोरच एपी १५ एएस ०२०२ या क्रमांकाची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट उभी होती. बराचवेळेपासून ती एकाच जागी असल्याने पोलिसांना संशय आला. वाहनात काहीतरी असल्याची माहिती खबऱ्याने पोलिसांनी दिली. माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक ए. टी. राठोड हे पथक घेऊन जिल्हा उद्योग केंद्राकडे गेले. संशयित स्थितीत असलेल्या या वाहनात तिघेजण बसून होते. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली. तेव्हा वाहनात सोन्याची दोन बिस्किटे आढळून आली. या बिस्किटांबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडे खरेदीचे कोणतेही बिल आढळून आले नाही. त्यांना विचारणा केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे मिळाली. माल चोरीचा असल्याच्या संशयावरून पोलिसांनी प्रकाश कृष्णमूर्ती यामसानी (वय ४२, रा. जमीकुंठा लेबर कॉलनी करीमनगर, तेलंगणा), सुरेश व्यंकटेश उटनूर (३२, रा. शिवाजी नगर आसिफाबाद) आणि सलीम बशीरउद्दीन शेख (२२ रा. कजरवाडी आसिफाबाद) यांना अटक केली. त्यांच्याकडून दोन सोन्याची बिस्किटे, रोख २० हजार, दोन मोबाईल आणि एक चारचाकी असा एकूण १० लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप दिवाण, अप्पर पोलिस अधीक्षक हेमराजसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक पगारे यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक राठोड, फौजदार शेख, हवालदार भुजाडे, मेश्राम, जाधव यांनी केली.

दैनिक भास्कर दि. 30.12.16

# सोने के बिस्कुट समेत लाखों का माल जब्त





## तेलंगाना के तीन आरोपी गिरफ्तार

ब्यूरो | चंद्रपुर

गुप्त सूचना के आधार पर लोकल क्राइम ब्रान्च की टीम ने छापामार कार्रवाई करते हुए सोने के बिस्कुट समेत 10 लाख 26 हजार रुपए का माल जब्त किया। इस मामले में पुलिस ने 3 आरोपियों को गिरफ्तार किया है।

प्राप्त जानकारी के अनुसार बुधवार को एलसीबी को मुखबिर के माध्यम से सूचना मिली कि जिला उद्योग केंद्र के सामने लाल रंग की स्विफ्ट कार क्र.ए.पी.15-ए.एस.0202 काफी समय से संदिग्ध अवस्था में खड़ी है। जिसके आधार पर एपीआई अजीत राठोड अपनी टीम के साथ मौके पर पहुंचे। वाहन में देखने पर उसमें 3 लोग बैठे थे। संदेह के आधार पर तीनों लोगों व वाहन की जांच की गयी जिसमें दो सोने के बिस्कुट बरामद हुए। इस संबंध में पूछताछ करने पर वह सोने के बिस्कुट कहां से लाए यह नहीं बता सके। उनके पास किसी प्रकार का बिल भी नहीं था। पूछने पर टालमटोल वाले जवाब दे रहे थे। जिससे पुलिस को यह माल चोरी या हेराफेरी का होने का संदेह हुआ। जिससे तेलंगाना निवासी प्रकाश कृष्णमूर्ति यामसानी (42), सुरेश व्यंकटेशम उटनुर (32) तथा सलाउद्दीन उर्फ सलीम बशीर उद्दीन शेख (22) को गिरफ्तार किया गया। पुलिस ने दो सोने के बिस्कुट (200 ग्राम) जिसकी कीमत 6 लाख, नगद 20 हजार 800 रुपए, 6 हजार रुपए के दो मोबाइल व 4 लाख की स्विफ्ट कार सहित कुल 10 लाख 26 हजार 800 रुपए का माल जब्त किया। मामले की और अधिक जांच पुलिस कर रही है। यह कार्रवाई एसपी संदीप दीवान के मार्गदर्शन में एलसीबी के पुलिस निरीक्षक जे.डी.पगारे के नेतृत्व में एपीआई अजित राठोड, सहायक फौजदार शेख रउफ, महेंद्र भुजाडे, प्रफुल्ल मेश्राम, विनोद जाधव, कुंदन बावरी आदि ने की।

# HANDLING COMMUNAL/CASTE TENSIONS

**Police Station : -** CHANDRAPUR POLICE
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 28/12/2016

देशोन्नती दि. 30.12.16

## दुसऱ्या दिवशीही अनधिकृत धार्मिक स्थळांवर बुलडोजर

प्रतिनिधी / २९ डिसेंबर

[illegible]



[illegible]

तरुण भारत दि. 30.12.16

## आणखी पाच मंदिरे जमीनदोस्त

### तुकूम परिसरात काही काळ तणाव

तभा वृत्तसेवा
चंद्रपूर, २९ डिसेंबर

[illegible]



तुकूम भागातील हनुमान मंदिराच्या भिंतीचे अतिक्रमण काढताना मनपाचे कर्मचारी

[illegible]

# INCIDENT FREE ARRANGEMENTS FOR BIG EVENTS

**Police Station** : - DURGAPUR
**District** : - Chandrapur, Maharashtra State
**Date of work** : - 25/12/2016

सकाळ दि 27/12/2016



चंद्रपूर : मार्गदर्शन करताना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार.

## पोलिसांमुळेच सामान्य माणूस सुरक्षित

### मुनगंटीवार : दुर्गापूर पोलिस ठाण्याच्या इमारतीचे भूमिपूजन

**चंद्रपूर, ता. २६ :** पोलिसांमुळे सामान्य माणूस सुरक्षित आहे. सज्जन माणसांना मित्र वाटावा असे चांगले काम पोलिसांनी करावे. यासोबतच वाईट प्रवृत्तींना ठेचण्याची भूमिकाही या विभागाने बजावावी. पोलिस विभागास अत्याधुनिक यंत्रणांद्वारे सुसज्ज करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दुर्गापूर पोलिस ठाण्याच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन रविवारी (ता. २५) पार पडले. याप्रसंगी मुनगंटीवार बोलत होते. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, पोलिस अधीक्षक संदीप दिवाण, अप्पर पोलिस अधीक्षक हेमराज राजपूत, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज जयस्वाल, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रल्हाद गिरी, जयचंद काठे, परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी अमन मित्तल, ऊर्जानगरच्या सरपंच लिना चिमूरकर उपस्थित होते.

जिल्ह्यात सर्वप्रथम सायबर लॅब सुरू करण्यात आली आहे. इतर जिल्ह्यांनी अनुकरण करावे, असे जिल्ह्यातील पोलिस विभागाने काम करावे. पोलिसांना चांगली घरे दिली जात असून जनतेची सेवा करणाऱ्याला उत्तम सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. पोलिसांचे मन समाधानी राहिले, तर जनता समाधानी राहील, असेही मुनगंटीवार म्हणाले.

यावेळी दिवाण, एम. देवेंदर सिंह यांचीही भाषणे झालीत. संचालन व आभार सहायक पोलिस निरीक्षक विकास मुंढे यांनी केले.

पुण्यनगरी दि 27/12/2016

## पोलीस सज्जनांना मित्र वाटावा : मुनगंटीवार

### ▪ दुर्गापूर पोलीस ठाण्याच्या इमारतीचे भूमिपूजन

**चंद्रपूर :** पोलीस विभागास अत्याधुनिक यंत्रणांद्वारे सुसज्ज करण्याचे प्रयत्न सुरू आहे. पोलिसांमुळेच सामान्य माणूस सुरक्षित आहेत. सज्जन माणसांना पोलीस आपला मित्र वाटावा इतके चांगले काम पोलिसांचे असले पाहिजे. यासोबतच वाईट प्रवृत्तींना ठेचण्याची भूमिकाही या विभागाने बजावली पाहिजे, असे प्रतिपादन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दुर्गापूर पोलीस ठाण्याच्या नव्याने मंजूर झालेल्या इमारतीचे भूमिपूजन रविवारी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी एम. देवेंदर सिंह, पोलीस अधीक्षक संदीप दिवाण, अप्पर पोलीस अधीक्षक हेमराज राजपूत, बांधकाम विभागाचे



कार्यकारी अभियंता मनोज जयस्वाल, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रल्हाद गिरी, जयचंद काठे, परिविक्षाधिन आयपीएस अधिकारी अमन मित्तल, ऊर्जानगरच्या सरपंचा लिना चिमूरकर आदी उपस्थित होते.

पोलीस विभागाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. सज्जनांसाठी मित्र तर दुर्जनांना शत्रू वाटावा असे काम पोलिसांना करणे आवश्यक आहे. पोलिस विभागास अत्याधुनिक केले जात आहे. आधुनिक यंत्रणामुळेच काही वर्षांपूर्वी ९.५ टक्के इतके असलेले दोषसिद्धीचे प्रमाण आता ५२ टक्क्यांवर पोहचले आहे. ९० टक्क्यांपर्यंत हे प्रमाण न्यायचे आहे, असेही मुनगंटीवार म्हणाले.

चंद्रपूर जिल्ह्याने सर्वप्रथम सायबर लॅब सुरू केली होती. त्यानंतर प्रत्येक जिल्ह्यात लॅब सुरू करण्यात आली. जिल्ह्यात पोलीस विभागाचे काम इतर जिल्ह्याने अनुकरण करावे इतके चांगले असले पाहिजे. पोलिसांना चांगली घरे दिली जात असून जनतेची सेवा करणाऱ्यांना उत्तम सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. पोलीसांचे मन समाधानी राहिले तर जनता समाधानी राहील, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. सुरुवातीला पालकमंत्र्यांनी इमारतीच्या नियोजित जागेचे भूमिपूजन केले. यावेळी पोलीस अधिक्षक संदीप दिवाण यांनी जिल्ह्यात पोलीस विभागासाठी मंजूर व सुरू कामांची माहिती दिली. गेल्या दोन वर्षात जिल्ह्यातील पोलीस दलासाठी जितकी कामे मंजूर झाली नसतील तितकी नाही कामे एकाच वर्षात झाली असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी एम. देवेंदर सिंह यांचेही यावेळी भाषण झाले. कार्यक्रमाचे संचलन व आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास मुंढे यांनी केले.

# SOLVING SENSATIONAL CRIMES

**Police Station : -** CHIMUR
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 25/12/2016

नवभारत दि 27/12/2016

## भाई की मदद से बहन ने कराई हत्या

### 24 घंटे के भीतर आरोपी गिरफ्तार



चिमूर (सं). उरकुडपार खेत परिसर में अनैतिक संबंध में हुई मनोज जुमनाके की हत्या के मामले में पुलिस 24 घंटे के भीतर आरोपी महिला प्रज्ञा गेडाम (35) और उसके भाई सिध्दार्थ लोखंडे (22) को संदेह के आधार पर सुबह 6 बजे गिरफ्तार किया है. बताया गया है कि 24 दिसंबर की रात मनोज को उरकुडपार बुलाया गया था. मनोज के पहुंचते ही गांव के पास स्थित खेत तालाब के पास सिध्दार्थ और फरार रिश्तेदार ने तेज हथियार से मनोज के सिर, पेट और हाथ पर कई वार कर मौत के घाट उतार दिया. हत्या के बाद उसे घसीटकर झाड़ियों में फेंक दिया गया था, लेकिन बंदरों को भगाने के लिए खेतों में मौजूद ग्रामीणों ने हत्या का राज खोल दिया. प्रकरण का एक आरोपी के फरार होने की जानकारी उपअधीक्षक डा. विशाल हिरे ने दी है.

### मनोज करता था सम्पर्क

पुलिस के अनुसार नवेगांव पेठ निवासी युवक मनोज नामदेव जुमनाके के साथ चिमूर में रहने वाली प्रज्ञा बंडू गेडाम इन दिनों छुट्टियां होने से उरकुडपार में अपने पिता के पास रह रही थी. प्रज्ञा के साथ लगातार मनोज द्वारा लगातार संपर्क किये जाने की वजह से विवाद हुआ और भाई सिध्दार्थ लोखंडे और फरार रिश्तेदार की सहायता से मनोज को मार्ग से हटाने की योजना को मूर्तरूप दिया गया.

### कॉल डिटेल से मिली मदद

मृतक मनोज की बहन के बयान, रिपोर्ट और मोबाइल के काल डिटेल के आधार पर पुलिस ने सोमवार की सुबह 6 बजे आरोपी महिला प्रज्ञा गेडाम और उसके भाई सिध्दार्थ लोखंडे को धर दबोचा. एक अन्य आरोपी फरार है. मामले की जांच उपअधीक्षक डा. विशाल हिरे के मार्गदर्शन में थानेदार दिनेश लबडे, एएसआई सुधाकर मारकोडे, वासु गेडाम, किशोर बोढे, कविता कुमरे, उज्ज्वला परचाके कर रहे हैं. सामूहिक प्रयास से पुलिस ने आरोपियों को 24 घंटे के भीतर गिरफ्तार कर लिया.

लोकमत दि 27/12/2016

## नातलगाच्या मदतीने काढला युवकाचा काटा

### दोघे गजाआड : पूर्व नियोजित खून



आरोपीला अटक करून घेऊन जाताना पोलीस कर्मचारी.

चिमूर : तालुक्यातील उरकुडपार शेतशिवारात अनैतिक संबंधातून घडलेल्या खून प्रकरणाचा २४ तासाच्या आत छडा लागला आहे. संशयित आरोपी महिला प्रज्ञा गेडाम व तिचा भाऊ सिद्धार्थ लोखंडे (२२) यास सोमवारी पोलिसांनी गजाआड केले असून एक आरोपी फरार आहे. नातलगाच्या मदतीने महिलेने युवकाचा काटा काढल्याची माहिती उपअधीक्षक डॉ. विशाल हिरे यांनी दिली.

नवेगाव पेठ येथील मनोज नामदेव जुमनाके या युवकासोबत चिमूर येथे राहणारी व सध्या उरकुडपार येथे वडिलाकडे राहणारी प्रज्ञा बंडू गेडाम हिचे सतत संपर्क होते. मात्र त्यांच्यात वाद झाल्याने मनोजचा काटा काढण्याचा डाव प्रज्ञाने रचला. प्रज्ञाने भाऊ सिद्धार्थ लोखंडे रा. उरकुडपार व एका नातलगाच्या मदतीने कट रचला. २४ डिसेंबरला फोन करून मनोजला उरकुडपारला बोलाविण्यात आले. मनोज उरकुडपारला पोहोचल्यानंतर गावालगत असलेल्या शेततळ्याजवळ भाऊ सिद्धार्थ व नातलगाच्या मदतीने मनोजच्या डोक्यावर व पोटावर धारदार शस्त्राने वार केला. यात मनोजचा मृत्यू झाला. त्याला फरफटत नेऊन झुडपात दडविण्याचा प्रयत्न केला.

माकडांना पळवून लावताना ही घटना ग्रामस्थांच्या निदर्शनास आली. मृतक मनोजच्या बहिणीच्या बयानाच्या व तक्रारीच्या आधारे तांत्रिक आणि गुप्त माहितीच्या आधारावर पहाटे ६ वाजता संशयित महिला आरोपी प्रज्ञा बंडू गेडाम (३५) आणि तिचा भाऊ सिद्धार्थ लोखंडे (२२) यांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे. पुढील तपास ठाणेदार दिनेश लबडे, एएसआय सुधाकर मारकोडे, वासू गेडाम, किशोर बोढे, कविता कुमरे, उज्ज्वला परचाके करीत आहेत. (प्रतिनिधी)

# RECOVERY OF STOLEN PROPERTY

**Police Station** : - LOCAL CRIME BRANCH
**District** : - Chandrapur, Maharashtra State
**Date of work** : - 24/12/2016

लोकमत समाचार दि 25/12/2016

## ₹5 लाख की महुआ शराब जब्त

खड़संगी। 24 दिसंबर। लोस

जिले में देसी-विदेशी शराब की बिक्री पर पाबंदी लगाये जाने का फायदा हाथभट्टीवाले उठा रहे हैं. अब जंगलों में बड़े पैमाने पर महुआ शराब बनाई जा रही है. चिमूर से 3 किमी दूर उमा नदी के पात्र तथा जंगल क्षेत्र में पुलिस ने छापा मारकर वहां से 400 लीटर महुआ शराब, 1600 किलो सड़ा हुआ महुआ व ड्रम जब्त किया. जिसकी कीमत 5 लाख 30 हजार 250 रुपए है. चिमूर पुलिस द्वारा शराब विक्रेताओं पर कड़ी कार्रवाई करने से वे दहशत में हैं. जिससे शराब तस्करी बंद हो गई है.

चिमूर शहर के नेताजी वार्ड में महुआ के फूलों से बनी शराब धड़ल्ले से बिक रही थी. जो जंगल में बनाई जाती है. इसकी गुप्त जानकारी मिलने पर पुलिस ने उक्त कार्रवाई की. जिसमें नेताजी वार्ड चिमूर निवासी रुख्माबाई सोनवाने (65) को गिरफ्तार किया गया. जबकि गुरुदास सोनवाने व शरद सोनवाने फरार हो गए.



नागभीड़ में पकड़ी गई शराब के साथ एलसीबी के जवान.

### नागभीड़ में 11 लाख की शराब मिली

स्थानीय अपराध शाखा की टीम ने नागभीड़ में एक कार को पकड़कर जांच की तो उसमें 6 लाख रु. की शराब मिली. इस समय शराब व गाड़ी मिलकर 11 लाख 9 हजार 500 रुपए का माल जब्त किया गया. अपराध शाखा ने गाड़ी का पीछा करके उसे पकड़ा और शराब व गाड़ी जब्त की. इस मामले में कार चालक इरफान पठान (25) वणोथी (बा.) व उसके साथी गिरिधर खोब्रागडे (31) सावरगांव को गिरफ्तार किया.

# GOOD WORK DONE

**Police Station : -** CHANDRAPUR POLICE
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 22/12/2016

लोकशाही दि 23/12/2016

## गुन्हेगारी रोखण्यासाठी सहकार्य करा : दिवाण

• आंबेझरी येथे जनजागरण मेळावा

चंद्रपूर (का.प्र.)- जनजागरण मेळाव्याच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना आलेल्या असून, नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा. तसेच नागरिकांनी समाजातील गुन्हेगारी व वाईट प्रवृत्तींना रोखण्यासाठी पोलिसांना सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक संदीप दिवाण यांनी केले. जिल्हा पोलिस प्रशासनाच्या वतीने जिवती तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या आंबेझरी येथे भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते मार्गदर्शन करत होते. अध्यक्षस्थानी आमदार ॲड. संजय धोटे होते.



यावेळी अपर पोलिस अधीक्षक हेमराजसिंह राजपूत, डेप्यु. कलेक्टर मित्तल, जिवतीचे तहसीलदार कुमार पवार, जिवती पंचायत समितीचे उप सभापती सुग्रीव गोतावळे, गडचांदूर उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर खिरडकर उपस्थित होते. यावेळी संजय धोटे यांनी, जिवती तालुक्यातील अतिदुर्गम भागातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करून जिवती तालुक्यातील रस्त्यांच्या सुधारणा विषयी व पोलिस कर्मचाऱ्यांच्या वसाहत बांधकामाबाबत माहिती दिली. मेळाव्यात ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेट वाटप, चप्पल वाटप व आरोग्य विभागातर्फे आलेल्या नागरिकांची आरोग्य तपासणी करून औषधीचे वाटप करण्यात आले. या मेळाव्यात विविध शाळेच्या विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. प्रास्ताविक पोलिस उपनिरीक्षक सोनवणे यांनी केले. संचालन हिरापूर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक काका नागरे यांनी, तर आभार पोलिस उपनिरीक्षक टेकाम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिवती तालुक्यातील आंबेझरी येथील ग्रामस्थ व गडचांदूर विभागातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, पोलिस मित्र व नागरिक उपस्थित होते.

पुण्यनगरी दि 23/12/2016

## अतिदुर्गम आंबेझरीत पोलीस विभागाचा जनजागरण मेळावा



जिवती : चंद्रपूर जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने जिवती तालुक्यातील अतिदुर्गम भाग असलेल्या आंबेझरी येथे मंगळवारी भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आमदार ॲड. संजय धोटे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक संदीप दिवाण, अपर पोलीस अधीक्षक हेमराजसिंह राजपूत, उपजिल्हाधिकारी अमन मित्तल, तहसीलदार कुमार पवार, पं. स. उपसभापती सुग्रीव गोतावळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर खिरडकर, परिसरातील पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष, सदस्य, प्रतिष्ठीत नागरिक, पोलीस मित्र व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी आमदार संजय धोटे यांनी, जिवती तालुक्यातील अतिदुर्गम भागातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करून तालुक्यातील रस्त्यांच्या सुधारणाविषयी व पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहत बांधकामाबाबत माहिती दिली. पोलीस अधीक्षक संदीप दिवाण यांनी नागरिकांना जनजागरण मेळाव्याच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. तसेच नागरिकांनी समाजातील गुन्हेगारी व वाईट प्रवृत्तींना रोखण्यासाठी पोलिसांना सर्वतोपरी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले. या जनजागरण मेळाव्यात ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेट वाटप, चप्पल वाटप व आरोग्य विभागातर्फे आलेल्या नागरिकांची आरोग्य तपासणी करून औषधीचे वाटप करण्यात आले. सदर मेळाव्यात विविध शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन काकासाहेब नागरे, प्रास्ताविक पोलीस उपनिरीक्षक सोनवणे यांनी केले. तर आभार पोलीस उपनिरीक्षक टेकाम यांनी मानले. यशस्वितेसाठी गडचांदूर विभागातील पोलीस अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी सहकार्य केले.

# ARRESTING GANGSTERS

**Police Station** : - SAOLI
**District** : - Chandrapur, Maharashtra State
**Date of work** : - 19/12/2016

पुण्यनगरी दि 20/12/2016

## खंडणीबहाद्दर मुळेवारला अटक

**५० हजाराची मागितली होती खंडणी** | **सावली पोलिसांची कारवाई**



**सावली :** येथील धान्य खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याला खंडणी मागणाऱ्या एका खंडणीबहाद्दराला पोलिसांनी रंगेहात अटक केली. ही कारवाई सोमवारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान सावली पोलिसांनी केली. सचिन लक्ष्मण मुळेवार (३०) रा. पद्मशाली वॉर्ड सावली असे आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी नंदकिशोर हरिकिसन सारडा यांचे सावली येथे धान्य खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. दरम्यान, आरोपी सचिन मुळेवार याने नंदकिशोर सारडा यांना ५० हजाराची खंडणी मागितली होती. खंडणी न दिल्यास तू अवैधरित्या गव्हाचा धंदा करतो. मी जर तहसीलदारांकडे तक्रार केली तर तुझ्यावर गुन्हा दाखल होईल, तसेच मी तुला खोट्या गुन्ह्यात फसवू शकतो कारण माझे वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चांगले संबंध आहे, अशी धमकी देत फिर्यादी नंदकिशोर सारडा यांच्याकडे ५० हजाराची खंडणी मागितली होती. मात्र, फिर्यादीची पैसे देण्याची मानसिकता नसल्याने त्यांनी सावली पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दिली. पोलिसांनी सोमवारी सकाळपासून सापळा रचून सचिन मुळेवार याला ३० हजाराची खंडणी घेताना रंगेहात अटक करण्यात आली. सचिन मुळेवार याच्यावर कलम ३८४, ३८५ अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. ही कार्यवाही उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्वप्नील धुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पेद्दाम, नैताम, सोनुले, सुधीर, प्रफुल्ल, दीपक, सचिन, आशिष, अनुप, केवट यांनी केली. पुढील तपास मूल येथील उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक स्वप्नील धुळे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक पेद्दाम करीत आहेत.

नवभारत दि 20/12/2016

## धान व्यापारी का ब्लैकमेलर गिरफ्तार

**सावली (सं.).** धान खरीदी की आड़ में सरकारी अनाज दुकान का अनाज खरीदकर ऊंचे दाम में बेचने वाले व्यापारी को ब्लैकमेल करने के आरोप में सावली पुलिस ने सचिन मुलेवार को आज 30,000 रुपए लेते रंगे हाथों गिरफ्तार किया. सावली निवासी कपड़ा व्यापारी नंदकिशोर सारडा का धान खरीदी का भी कारोबार है. इसकी आड़ में सारडा सरकारी सस्ते अनाज दुकान का गेहूं और चावल खरीदकर ऊंचे दाम में बेचता है. इसकी जानकारी आरोपी सचिन को थी.



### ₹30,000 लेते रंगेहाथ पकड़ा

आरोपी सचिन ने नंदकिशोर से धमकी दी कि उसके तहसील कार्यालय के कई अधिकारियों से अच्छी जान पहचान है. यदि उसने सूचना दी तो अधिकारी उसके खिलाफ जांच और कार्रवाई कर सकते हैं. यदि नंदकिशोर उसे 50 हजार रुपए दे तो वह अपना मुंह बंद रखेगा. नंदकिशोर की रुपए देने की इच्छा न होने से उसने पुलिस को इसकी सूचना दी. इस आधार पर 19 दिसंबर को पुलिस ने सचिन को 30,000 रुपए लेते रंगे हाथों गिरफ्तार किया. मामले की जांच एसडीपीओ के मार्गदर्शन में थानेदार स्वप्निल धुले, पेद्दाम, नैताम, सोनुले आदि कर रहे हैं.

देशोन्नती दि 20/12/2016

## ३० हजार रुपयाची खंडणी मागणाऱ्यास रंगेहाथ अटक

*शहर प्रतिनिधी / १९ डिसेंबर*

**सावली :** येथील व्यापारी नंदकिशोर हरिकिसन सारडा यांना ३० हजाराची खंडणीची मागणी करणाऱ्या सचिन मुळेवार (३०) रा. पद्मशाली वार्ड सावली यास आज सकाळी १२ वाजता सावली पोलिसांनी रंगेहात अटक केली.



नंदकिशोर हरिकिसन सारडा यांचे धान्य खरेदी विक्रीचा धंदा असून आरोपी सचिन मुळेवार याने सारडा यांना अवैधरित्या धंदा करतोस याबाबत मी तहसिलदार यांना तक्रार केली तर तुझ्यावर गुन्हा दाखल होतो मी तुला फसवू शकतो कारण माझे वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत चांगले संबंध आहेत मी तेव्हाही खोट्या केसमध्ये तुला फसवू शकतो. मालाची थोडेफार वारंवार ५०,००० रु की मागणी करीत होता.

आरोपीच्या जाचाने कंटाळून सारडा यांनी सावली पो. स्टे. ला रीतसर तक्रार दिल्याने १९ डिसेंबरला सारडा यांचे कापड दुकानात सचिन मुळेवार यास ३०,००० रु देताना सावली पोलिसांनी त्यास रंगेहाथ पकडले व पो. स्टे. सावली येथे अप क्र १७०/१६ कलम ३८४,३८५ भादवी अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही उपविभागीय पोलिस अधिकारी मुल यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. स्वप्नील धुळे स.फौ. संपती पेद्दाम हा. पो.हवा. नैताम, सोनुले नापोशी सुधिर, पो.शि. प्रफुल्ल, दिपक, सचिन, आशीष, अनुप चालक पोशी केवट यांनी केली.

गुन्ह्याच्या पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी मा. मुल व पो. नि. स्वप्नील धुळे यांचे मार्गदर्शनाखाली संपती पेद्दाम करीत आहेत. याबाबत सुधा शहर आरोपीने सावली येथील आईपार यांच्या विनयभंग प्रकरणात खंडणीची मागणी केली असल्याने तसेच विनयभंग व अवैध दारु विक्रीच्या संदर्भात त्याच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे.

# RECOVERY OF STOLEN PROPERTY

**Police Station : -** LOCAL CRIME BRANCH
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 19/12/2016

महाविदर्भ दि 20/12/2016

## घरफोडी करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

चंद्रपूर (का.प्र.) - मौजमस्ती व चैनीच्या वस्तु खरेदी करण्यासाठी ठिकठिकाणी घरफोडी करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने गजाआड केले. पोलिस सुत्राने दिलेल्या माहिती नुसार रोहीत उर्फ ईलम आदेशराव ईलमकर रा. वार्ड क्र. १ सुगतनगर पागल बंगाली, अयप्पा मंदिर जवळ चंद्रपूर, विशाल दादाजी खंडाळे रा. वार्ड क्र. १ समता नगर, कोवे यांचे घराजवळ चंद्रपूर हे मित्र असून यांनी पो.स्टे. दुर्गापूर तसेच पो. स्टे. रामनगर परिसरातील घरफोडीचे गुन्हे केलेले असून ते कोणतेही कामधंदा न करता चोरीच्या पैश्याने महागडे मोबाईल तसेच मौजमस्ती करीत फिरत आहेत अश्या खबरेवरून पोलिस अधीक्षक संदिप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक जे. डी. पगारे यांनी आपले अधिनस्त असलेले पोउपनि सुनिल नही. उईके, सफौ. रऊफ शेख, दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, महेंद्र भुजाडे, गणेश भोयर, प्रांजल झिलपे, कुंदन बावरी असे एक पथक तयार करून मिळालेल्या माहिती प्रमाणे सदर परिसरात पाठविले असता आरोपी रोहीत उर्फ ईलम आदेशराव ईलमकर, विशाल दादाजी खंडाळे यांना ताब्यात घेवून सखोल विचारपूस केली असता त्याने आपले बयानात वरील आरोपींनी मिळून पो.स्टे. दुर्गापूर अप.क्र. २४८/१६ कलम ४५७, ३८० भादंवि, पो.स्टे. दुर्गापूर अप.क्र. ३१०/१६ कलम ४५७, ३८० भादंवि व पो.स्टे. रामनगर अप.क्र. ११९६/१६ कलम ४५७, ३८० भादंविचे गुन्हे केलेले असून आरोपींनी गुन्हा कबुल केला आहे.

पुण्यनगरी दि 20/12/2016

## घरफोडी करणारी टोळी गजाआड

चंद्रपूर : शहरातील विविध घरफोडी प्रकरणातील टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. रोहीत उर्फ ईलम आदेशराव ईलमकर (१८) रा. सुगतनगर अय्यप्पा मंदिरजवळ चंद्रपूर आणि विशाल दादाजी खंडाळे (२१) रा. समतानगर चंद्रपूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

शहरालगतच्या दुर्गापूर पोलीस ठाणे हद्दीतल रामनगर आणि शहर पोलीस ठाणे हद्दीत मागील काही महिन्यांपासून चोरी, घरफोडीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली होती. या घटनांमुळे नागरिक दहशतीत असताना पोलीस विभागासमोर या घटनातील आरोपींचा शोध घेण्याचे आवाहन निर्माण झाले होते. दरम्यान, काही युवक महागडे मोबाईल व चैनीच्या वस्तू खरेदी करीत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे एलसीबीचे पोलीस निरीक्षक जयवंत पगारे यांनी पोलीस उपनिरीक्षक उईके यांच्या नेतृत्वात सहाय्यक फौजदार रऊफ शेख, दौलत चालखुरे, पद्माकर भोयर, महेंद्र भुजाडे, गणेश भोयर, प्रांजल झिलपे, कुंदन बावरी यांचे पथक निर्माण केले होते. हे पथक मागील काही दिवसांपासून आरोपींच्या मागावर होते. दरम्यान, मिळालेल्या माहितीची खात्री पटताच पोलिसांनी रोहीत ईलमकर आणि विशाल दादाजी खंडाळे या दोघांना ताब्यात घेतले. अधिक चौकशीनंतर त्यांनी चोरीची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून पॅनासोनिक कंपनीचा ४२ इंचीचा एलईडी टिव्ही, पाच वेगवेगळ्या नारीच्या सिन्थेटिक साड्या, फिलिप्स कंपनीचा होमथियटर असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. आरोपीने केलेल्या चोरीचे दुर्गापूर आणि रामनगर पोलिसात गुन्हे दाखल आहेत.

नवभारत दि 20/12/2016

## ₹11.23 लाख की शराब जब्त की गई



जब्त माल के साथ गढ़चांदूर के थानेदार व पुलिस कर्मचारी.

चंद्रपुर | 19 दिसंबर | लोस

पुलिस ने जिले में तीन स्थानों पर शराब तस्करों को पकड़कर उनके पास से 11 लाख 23 हजार 600 रुपए की शराब बरामद की. गढ़चांदूर के करीब इसापुर में शनिवार की रात 8 बजे नाकाबंदी के दौरान शराब लाते हुए दो लोगों को पुलिस ने पकड़ा.

उनके पास से देसी शराब की 20 पेटियां मिलीं. कार्रवाई में 6 लाख 72 हजार 800 रुपए की शराब मिली. इस दौरान एक कार जब्त की गई, जिसकी कीमत 5 लाख रु.है. आरोपियों में कोष्टाला के शेख अब्बास (27) व लक्कड़कोट निवासी प्रवीण कांबले (20) का समावेश है.

बल्लारपुर पुलिस ने विसापुर निवासी अरुण जगताप (50) व शब्बीर युसुफ शेख (30) को पकड़ा. जिनके पास से पौने दो लाख रुपए का माल मिला.

# RECOVERY OF STOLEN PROPERTY

**Police Station : -** LOCAL CRIME BRANCH
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 16/12/2016

देशोन्नती दि.१७/१२/२०१६

## ७ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी / १६ डिसेंबर

चंद्रपूर : स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आज दि.१६ डिसेंबरला पोलिस स्टेशन बल्लारशाह परिसरात पेट्रोलिंग करीत असताना त्या दरम्यान गोपनीय माहितीद्वारे टाकलेल्या धाडीत चोरीचा कोळसा व वाहन असे एकुण ७ लाख ४४ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.



सदर परिसरात काही इसम अवैधरित्या कोळसा वाहतूक करण्याच्या उद्देशाने हालचाल करीत आहे, अशा मिळालेल्या खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक त्वरीत घटनास्थळी पोहचले असता बीराम वार्ड बल्लारशाह येथे काही इसम दोन वेगवेगळ्या टाटा एस गाडीमध्ये दगडी कोळसा भरत होते. तो कोळसा त्यांनी कोठून तरी चोरून आणला असावा असा संशयावरून पोलिसांनी त्यांना विचारपूस केली असता त्यांच्याकडे असलेल्या मालाचा कोणताही पुरावा नसल्याने सदर माल ताब्यात घेवुन एका वाहनातुन दहा हजार रुपयाचा तर दुसऱ्या वाहनातुन १२ हजार ५०० रुपयाचा दगडी कोळसा मिळुन आला. दोन टाटा एस वाहन क्र. एम एच ३४ ए बी ६२६० व एम एच ३४ ए बी ६२५० एकुण वाहन किंमत ३,००,०००/- रु असा एकुण ४ लाख २२ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन जगदिश किसन पेंदापल्लीवार, अक्षय गोरेलाल सविता, रवी हीरालाल बहुरीया, रविंद्र रमेश राजपुत, पवन गायकवाड असे एकुण पाच आरोपीस अटक करण्यात आले आहे.

ही कार्यवाही करीत असतानाच स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास एक महिंद्रा पीकअप वाहन क्र एम एच ३४ ए बी ३४१६ येताना दिसली असता संशयावरून वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये डब्लु सी एल मधील मशीनचे लोखंडी स्क्रॅप पार्ट दिसुन आले. मालाची हक्कयाबाबत कोणतेही पुरावे नसल्याने सदर वाहन ताब्यात घेवुन वाहनातुन २०,०००/- रु माल एक मोबाईल

लोकमत दि.१७/१२/२०१६

## भंगार व कोळशाची तीन वाहने पकडली



जप्त करण्यात आलेली कोळसा भरलेले वाहने.

बल्लारपूर : चंद्रपूरच्या एलसीबी पथकाने येथील वेकोली क्षेत्र वस्ती विभागातील सुभाष वॉर्डमध्ये शुक्रवारी सकाळी दोन कोळशाची आणि एक भंगार भरलेले वाहन पकडले. तिन्ही वाहने पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहेत.

गेल्या अनेक दिवसापासून वेकोलि क्षेत्रामध्ये कोळसा चोरीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू आहे. चोरलेला कोळसा वाहनात भरून राजरोस वाहतूक केली जाते. त्याबाबत सुरक्षा रक्षकांना काहीही माहिती नसते. वेकोलि कर्मचाऱ्यांनी तक्रार केल्यानंतरदेखील कोळसा चोरांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. दरम्यान गुप्त माहितीच्या आधारे चंद्रपूर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कोळशाची तस्करी करणारी दोन वाहने रोखून पकडली. याप्रकरणी सहा जणांची विचारपूस सुरू आहे. (शहर प्रतिनिधी)

# RECOVERY OF STOLEN PROPERTY

**Police Station : -** LOCAL CRIME BRANCH
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 16/12/2016

तरुण भारत दि 18/12/2016

## नकली सोने विकणाऱ्या ठकबाजांना बेड्या

- व्यापाऱ्याची केली फसवणूक
- तब्बल ९ शिक्के निघाले बनावट

तभा वृत्तसेवा
चंद्रपूर, १७ डिसेंबर

नकली सोने विकून व्यापाऱ्याची फसवणूक करू पाहणाऱ्या सात ठकबाजांना गडचांदूर पोलिसांनी बेड्या घातल्या. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील एका कापूस व्यापाऱ्याला तब्बल १८ हजार रुपयांनी या भामट्यांनी गंडविण्याचा प्रयत्न केला. खरेदी केलेल्या दहा सोन्याच्या शिक्क्यांपैकी तब्बल ९ शिक्के नकली निघाले. ही कारवाई गडचांदूर पोलिसांनी शुक्रवारी केली.

तुकाराम काळे व रमेश चव्हाण (४०) रा. शिरपूर, जि. वाशिम, शामराव आत्राम (५०) रा. माहोरा, जि. यवतमाळ, विनायक विठ्ठल कोवळे (५०) रा. मायाळी, ता. जिवती, जैतू मडावी, रामू मडावी (४०) रा. जनकापूर, ता. जिवती, प्रकाश कोटनाके रा. सोनापूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील कापूस व्यापारी मोहन पोशेट्टी म्यानेवार यांना १३ डिसेंबरला सायंकाळी ६.३० वाजता शामराव आत्राम याने पांढरकवडा येथील बसस्थानकावर थांबविले. पाच किलो सोने विकायचे असून, ते खरेदी करण्यासाठी तुम्हाला गडचांदूरला जावे लागेल असे सांगितले. आत्राम याने सोन्याला २० हजार तोळा भाव सांगितला. सोने बघून भाव ठरवू, असे म्यानेवार त्याला म्हणाले. चारचाकी वाहनाने १० वाजताच्या



सुमारास मोहन म्यानेवार, पांढरकवडा येथील सुनील कासलवार, शामराव आत्राम, संतोष राऊत दुसरी गडचांदूर येथे पोहोचले. दरम्यान, नाश्ता करण्याकरिता गडचांदूर माणिकगड चौकात थांबले असता तेथे त्यांना शामराव आत्रामच्या ओळखीचे जैतू मडावी, रामू मडावी मिळाले. त्यानंतर ते सर्व वाहनाने गडचांदूर येथून विष्णू मंदिराकडे गेले. दरम्यान, म्यानेवार यांनी आरोपींकडून १८ हजार रुपयांत सोन्याचे १० शिक्के खरेदी केले. त्यानंतर त्यामधील १ शिक्का सोन्याचा व बाकी ९ शिक्के नकली असल्याचे म्यानेवार यांच्या लक्षात आले. त्यांनी याबाबतची तक्रार गडचांदूर पोलिस ठाण्यात दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी चौकशी करून सर्व सात आरोपींना अटक केली. ही कारवाई पोलिस उपविभागीय अधिकारी सुधीर खिरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार विनोद रोकडे, पोलिस उपनिरीक्षक राठोड, सुनील मेश्राम, राजू गुरनुले, वाटेकर आदींनी केली.

पुण्यनगरी दि 18/12/2016

## बनावट सोने विकून व्यापाऱ्यास गंडविले

- पाच आरोपींना अटक; दोन फरार



गडचांदूर : गडचांदूरनजिक असलेल्या गोवरीगुडा परिसरात कापूस खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या मोहन पोशेट्टी म्यानेवार या व्यापाऱ्यास बनावट सोने विकून लुबाडणूक करण्यात आल्याचा प्रकार [illegible] आला आहे. याप्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. शामराव भोजराज आत्राम, रा. माहोरा (जि. यवतमाळ), विनायक विठ्ठल कोवळे रा. मायाळी (जि. चंद्रपूर), प्रकाश सुधाकर कोटनाके रा. सोनापूर (जि. चंद्रपूर), जयतु मुत्ता मडावी, रा. जनकापूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तर मुख्य आरोपी तुकाराम काळे रा. वाशिम व रमेश चव्हाण रा. शिरपूर (जि. यवतमाळ) हे दोघे फरार आहेत.

म्यानेवार यांना भ्रमणध्वनीद्वारे ५ किलो सोने असल्याची माहिती देऊन प्रतितोळा २० हजार रुपये दराने हे सोने देण्याची माहिती देण्यात आली. म्यानेवार यांनी त्यांच्याकडून पडताळणीसाठी सोन्याचे १० नाणे विकत घेतले. त्या मोबदल्यात १८ हजार रुपये त्यांनी दिले. नंतर आणखी आपल्याकडे पाच किलो सोने असून, तेसुद्धा स्वस्तात तुम्हाला देऊ अशी बतावणीही करण्यात आली. म्यानेवार यांनी नाणी घेऊन त्याची शहानिशा केली असता, त्यातील एकच नाणे सोन्याचे आणि इतर बनावट असल्याचे निदर्शनास आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी गडचांदूर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून पोलिसांनी १५ डिसेंबरच्या सायंकाळी आरोपींवर भादंवि ४८६/१६, ४२०/३४ कलमान्वये गुन्हे दाखल करून पाच आरोपींना अटक केली. आरोपींना न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असून, पुढील तपास उपविभागीय अधिकारी खिरडकर, ठाणेदार रोकडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक पी. के. राठोड करीत आहेत.

# HELPING WOMEN IN DISTRESS SITUATION

**Police Station** : - SUB POLICE STATION PITTIGUDA
**District** : - Chandrapur, Maharashtra State
**Date of work** : - 16/12/2016

पुण्यनगरी दि. १६/१२/२०१६

# चंद्रपूरच्या स्त्री आधार केंद्रातून आदिवासी तरुणी बेपत्ता

महेंद्र ठेमस्कर / चंद्रपूर

[illegible]



## चौकशीचे आदेश दिले : एसपी दिवाण

[illegible]

# RECOVERY OF STOLEN PROPERTY

**Police Station : -** DURGAPUR
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 14/12/2016

देशोन्नती दि 15/12/2016

## घरफोडी प्रकरणातील आरोपीस सात दिवसात अटक





### संशयीतामध्ये निघाला दुचाकी चोर

सकाळ दि 15/12/2016

## चपलेच्या पुराव्याने लागला चोरीचा तपास

### लाखोंचे दागिने जप्त : ५६ तरुणांची केली चौकशी

सकाळ वृत्तसेवा



चंद्रपूर : आरोपीकडून लाखो रुपयांचे जप्त करण्यात आलेले सोन्याचे दागिने.

### दुचाकीचोरी उघडकीस

### चपलेच्या पुराव्याने लागला चोरीचा तपास

# GOOD WORK DONE

**Police Station : -** CHANDRAPUR POLICE
**District : -** Chandrapur, Maharashtra State
**Date of work : -** 09/12/2016

सकाळ दि 12/12/2016

## विद्यार्थ्यांनो, देशहितासाठी संवेदनशील व्हा

### पोलिस अधीक्षक दिवाण : युवा जनजागरण मेळावा

सकाळ वृत्तसेवा

चंद्रपूर, ता. ११ : भारत देश हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. तरुण म्हणजे १८ वयोगटातील व्यक्ती नसून, ते वयाचे ८० पर्यंतसुद्धा तरुण असू शकतात. वय हे केवळ एक सांख्यिकी आकडा असून, तरुणाई ही खरी व्यक्तीच्या मनातून असते. त्यामुळे समाज व देशहितासाठी वाईट बाबींना आळा घाला.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयापुरतेच आपले क्षेत्र मर्यादित न ठेवता महाविद्यालयाच्या बाहेरसुद्धा वाईटांबाबत संवेदनशील भूमिका ठेवावी, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक संदीप दिवाण यांनी केले. चंद्रपूर पोलिस विभागाद्वारा पोलिस मुख्यालयाच्या परिसरात सभागृहात युवा जनजागरण मेळावा झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना दिवाण म्हणाले, समाजाचे भविष्य म्हणून असल्या जबाबदाऱ्या कोणत्या याची माहिती त्यांनी दिली. काही महिन्यांपूर्वी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये एकाच दिवशी एकाच वेळी हुसे नो टू फू ही जनजागृती मोहिम राबविण्यात आली. त्यातील प्रत्येक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, पालक तसेच पोलिस यांचा समावेश असलेली हुसे नो टू समितीक स्थापन करण्यात आली. नुकत्याच ९ डिसेंबर रोजी या मोहिमेचा पहिला टप्पा म्हणून जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील या समितीअंतर्गत विद्यार्थी, प्राचार्य आणि प्राध्यापकांचा एकत्रित युवा जनजागरण मेळावा झाला. प्रास्ताविक हेमराजसिंह राजपूत यांनी केले. संचालन विकास मुंढे यांनी केले.




चंद्रपूर : युवा जनजागरण मेळाव्यात बोलताना पोलिस अधीक्षक दिवाण.

लोकमत दि 11/12/2016

**'से नो टू मोहीम' : महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद**

# पोलीस विभागातर्फे युवा जनजागरण मेळावा

चंद्रपूर : चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप दिवाण यांच्या संकल्पनेतून स्थानिक पोलीस मुख्यालयात युवा जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यातील महाविद्यालयातून मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राचार्य आणि प्राध्यापक उपस्थित होते.

पोलीस विभागातर्फे, काही महिन्यांपूर्वी जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयामध्ये एकाच दिवशी एकाच वेळी 'से नो टू' ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली होती. त्याअंतर्गत प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, पालक तसेच पोलिसांचा समावेश असलेली 'से नो टू' समिती स्थापन करण्यात आली. या मोहिमेचा पुढील टप्पा म्हणून जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील 'से नो टू' समिती असलेले विद्यार्थी व प्राचार्य तसेच प्राध्यापकांना एकत्रित करण्यात आले.

यावेळी विविध विषयांवर पॉवरपॉईन्ट प्रेझेन्टेशनद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. से नो टू ट्राफिक व्हायलन्स, से नो टू क्राईम अगेन्स्ट वुमन, से नो टू चाईल्ड अब्युज, से नो टू ड्रग्स, से नो टू नक्षलीझम, से नो टू गुंडागर्दी, यासोबतच कॅशलेस ट्रान्झेक्शन या ज्वलंत विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पोलीस अधीक्षक संदीप दिवान यांनी विविध ज्वलंत विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नेमके समाजाचे भविष्य म्हणून आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत, याबाबत त्यांच्या व्याख्यानातून पुन्हा एकदा उहापोह करण्यात आला. आपला देश तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. तरुण म्हणजे केवळ १८ वर्षांतील व्यक्ती नसून ते वयाचे ८० पर्यंत सुद्धा तरुण असू शकतात. उपस्थित सर्व प्राध्यापक तथा प्राचार्यांनी स्वतः तरुण म्हणूनच समाजातील वाईट गोष्टींना आळा घालण्याकरिता पुढाकार घेऊन एक चांगला, निर्व्यसनी व निर्भय समाज निर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन दिवान यांनी केले.



युवक मेळाव्याला मार्गदर्शन करताना संदीप दिवाण आणि पोलीस अधिकारी.

### कॅशलेस व्यवहाराची माहिती

- कॅशलेस पेमेंट या विषयावर उमंग पालन यांनी कॅशलेस व्यवहाराचे सोपे मार्ग विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. त्यामध्ये त्यांनी युनिफाईड पेमेंट इंटरफेस, ई-वॉलेट, पिओएस, आधार सक्षम पेमेंट सिस्टीम, पुरक सेवा माहिती आदी बाबत माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अपर पोलीस अधीक्षक हेमराजसिंह राजपूत यांनी केले. त्यांनी पॉवरपॉईन्ट प्रेझेन्टेशनद्वारे 'मद्य पदार्थ', या विषयावरसुद्धा विस्तृत विवेचन केले. कार्यक्रमाकरिता पोलीस निरीक्षक अशोक कोळी व महिला पोलीस उपनिरीक्षक वर्षा खरसान यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. संचालन पोलीस उपनिरीक्षक विकास मुंढे यांनी केले. (प्रतिनिधी)

नवभारत दि 11/12/2016

# पोलीस विभागाच्या युवा जनजागरणला उत्स्फूर्त प्रतिसाद




चंद्रपूर : 'से नो टू ट्राफिक व्हायलन्स, से नो टू क्राईम अगेन्स्ट वुमन, से नो टू चाईल्ड अब्युज, से नो टू ड्रग्स, से नो टू नक्षलीझम, से नो टू गुंडागर्दी यासोबतच कॅशलेस ट्रान्झेक्शन, या विषयांवर युवकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शुक्रवारी पोलीस विभागातर्फे स्थानिक परिसर सभागृहात एक दिवसीय युवा जनजागरण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला युवक, युवतींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये पोलीस विभागातर्फे से नो टू ही मोहीम राबविण्यात आली. यानंतर से नो टू समिती स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये महाविद्यालयातील युवक, युवती, प्राध्यापक, प्राचार्य यांचा समावेश करण्यात आला होता. या समितीतील सदस्यांना एकत्रित करून हा युवा जनजागरण मेळावा आयोजित करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक संदीप दिवाण, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हेमराजसिंग राजपूत यांनी से नो टू मोहिमेविषयी तर कॅशलेस ट्रान्झेक्शनवर उमंग पालन यांनी मार्गदर्शन केले. युवक देशाचे आधारस्तंभ असून, समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती, वाईट गोष्टीला आळा घालण्यासाठी पुढाकार घेऊन निर्व्यसनी आणि निर्भय समाज घडविण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन संदीप दिवाण यांनी केले.

उमंग पलन यांनी युनिफाईड पेमेंट इंटरफेस, ईवॉलेट, पीओएस, आधार सक्षम पेमेंट सिस्टीम, पुरक सेवा आदींबाबत प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण केले. यावेळी वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक कोळी, पोलीस उपनिरीक्षक वर्षा खरसान यांनीही मार्गदर्शन केले. संचालन विकास मुंढे यांनी केले. युवा जागरण कार्यशाळेला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार, १५०० विद्यार्थी, २०० प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांची उपस्थिती होती.

सकाळ दि 07/12/2016

# ध्वनिप्रदूषणाची तक्रार आता व्हॉट्सअॅपवर



## नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर बसणार चाप

सकाळ वृत्तसेवा

चंद्रपूर, ता. ६ : नियमांना धाब्यावर बसवीत एखाद्या उत्सवापासून तर छोटेखानी कार्यक्रमासाठी ढोल-ताशे यांसह डीजे वाजवल्या जातो. यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. याबाबत नियम असूनही तक्रार कोठे नोंदवाही हा प्रश्न नागरिकांना होता. आता याकरिता पोलिस प्रशासनाकडून व्हॉट्सअॅप क्रमांकाची सुविधा देण्यात आली आहे. येथे तक्रार नोंदविता प्रशासनाकडून त्वरित कारवाई करण्यात येणार आहे.

ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अगदी छोट्या उत्सवापासून तर कौटुंबिक कार्यक्रमातही या नियमांचे उल्लंघन होणे नित्याचे झाले आहे. मात्र, आनंदाचा हा उन्माद सामान्य नागरिकांच्या अंगावर येत आहे. कर्णकर्कश आवाज सातत्याने कानावर पडत असल्यामुळे त्यांच्यावर याचा शारीरिक तसेच मानसिक ताण पडत आहे. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. धार्मिक, सामाजिक कार्यातच ही समस्या अधिक उद्भवली असल्याचे दिसून येत आहे. या विरोधात कडक कारवाई करण्याचे नियम आहेत. मात्र, सामान्य नागरिकांनी याची तक्रार नेमकी कोठे करावी हा प्रश्न होता. याचीच दखल घेत पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून ९४०४८७२१०० व ७०५७४६९४४२ या दूरध्वनी क्रमांकावर व्हॉट्सअॅपची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यामुळे एखाद्या ठिकाणी ध्वनिप्रदूषण होत असल्यास याबाबतची तक्रार वरील क्रमांकावर नोंदविता येणार आहे. याकरिता नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

तरुण भारत दि 07/12/2016

# ध्वनिप्रदूषणाची तक्रार करा 'वॉट्सअॅप'वर

तभा वृत्तसेवा
चंद्रपूर, ६ डिसेंबर

पोलिस महासंचालकांनी दिलेल्या सूचनेनुसार जिल्ह्यात आगामी सण, उत्सव, ईद-ए-मिलाद, नाताळ तसेच नववर्षाच्या प्रारंभी होणाऱ्या कार्यक्रमामुळे प्रदूषण होणार नाही, या अनुषंगाने जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले असून, ९४०४८७२१०० व ७०५७४६९४४२ या क्रमांकावर वॉट्सअॅप व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना यापूर्वी प्रसारित केलेल्या संबंधित पोलिस ठाण्याचा दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी तसेच नव्याने आता दिलेल्या पोलिस नियंत्रण कक्षातील वॉट्सअॅप क्रमांकावरही ध्वनिप्रदूषणसंदर्भातील तक्रारी नोंदविता येऊ शकणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात कुठे ध्वनिप्रदूषण होत असल्यास त्याची तक्रार नागरिकांनी दिलेल्या नंबरवर तातडीने करावी, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक चंद्रपूर यांनी केले आहे.

दैनिक भास्कर दि 07/12/2016

# ध्वनिप्रदूषण की शिकायत वॉट्सअप पर करें

चंद्रपुर। पुलिस महासंचालक द्वारा दी गई सूचना अनुसार जिले के आगामी पर्व, उत्सव में तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, ईद-ए-मिलाद, क्रिसमस तथा नववर्ष के उपलक्ष्य में ध्वनि प्रदूषण रोकने के मद्देनजर जिला पुलिस नियंत्रण कक्ष स्थापित कर 9404872100 तथा 7057469442 क्रमांक पर वॉट्सअप व्यवस्था की गई है। इस वॉट्सअप मोबाइल क्रमांक पर ध्वनि प्रदूषण की शिकायतें दर्ज कर सकेंगे। जिससे जिले में कहीं भी ध्वनि प्रदूषण हो रहा होगा तो, इसकी शिकायत नागरिकों ने संबंधित क्रमांक पर करने की अपील जिला पुलिस अधीक्षक चंद्रपुर ने की।